| पुणे जिल्हा परिषद- Process Mapping -Template | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | विभागाचे नाव | सामान्य प्रशासन विभाग | | |
| अ. क्र. | प्रक्रिया स्थिती (Steages of Process Mapping) | बाब | | माहिती | शेरा |
| PC१ | प्रक्रिया ओळख व वर्गीकरण (Process Identification and Classification) | प्रक्रियेचे **नाव** | | जिल्हा परिषदेकडील वर्ग- ३ व वर्ग-४ कर्मचारी निलंबित करणे. | |
| PC२ | | कार्यासन **संकेतांक** (उदा. आस्था1, लेखा 4) | | **आस्था-६** | |
| PP१ | प्रक्रिया प्रस्तावित करणे (process proposal) | प्रक्रिया प्रस्तावित करणाऱ्या अधिकारी /कर्मचारी (Maker)- **पदनाम** | | **वरिष्ठ सहाय्यक / कनिष्ठ सहाय्यक** | |
| PP२ | | संदर्भीय कायदा, नियम मॅन्युअल, अधिसूचना, शासन निर्णय, परिपत्रक, न्यायालय निकाल, शासन पुस्तके,पत्रे इत्यादी क्रमांकासह शिर्षक नमुद करावेत. | | १..महाराष्ट्र जिल्हा परिषदा , जिल्हा सेवा (शिस्त व अपील ) नियम १९६४ च्या नियम ३ (१) ३(२)<br>२. शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासनपरिपत्रक क्र.डीइएन/२६८९/सीआर /७६५ /२० दि.४ जुन १९९०<br>निलंबन म्हणजे शिक्षा नव्हे निलंबन दोन प्राकरचे असते.१ शिक्षा म्हणून व २) अंतरित उपाय म्हणून महाराष्ट्र नागरी सेवा (शिसत व अपिल) नियमात अंतरिम उपाय म्हणून असणा-या निलंबन विषयक तरतुदी आहेत नियुक्ती प्राधिकारिकिंवा नियुक्ती प्राधिकारी ज्या प्राधिका-याच्या नियंत्रणाखाली आहे असा कोणताही प्राधिकारी किंवा शिस्तभंगविषयक प्राधिकारी किंवा राज्यपालांनी या संबंधात सर्वसाधारण व विशेष आदेशाव्दारे अधिकार प्रदान केलेला अन्य कोणताही प्राधिकारी शासकीय कर्मचा-याला<br>१. ज्या बाबतीत त्याच्याविरुध्द शिस्तभंग विषयक कार्यवाही कीण्याचे योजिले असले किंवा अशी कार्यवाही प्रलंबित असेल किंवा<br>२. ज्या बाबतीत तो कर्मचारी राज्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने बाधक ठरणा-या कार्यामध्ये गुंतलेला आहे असे पूर्वोक्त प्राधिका-याचे मत असेल किंवा<br>३. ज्या बाबतीत त्याच्याविरुध्द कोणत्याही फौजदारी गुन्हयाच्या संबंधात खटल्याचे अन्वेषण चौकशी किंवा न्यायचौकशी चालु असेल अशा बाबतीत निलंबाधीन ठेवू शकेल.<br>निलंबन शिक्षा नसल्याने या निलंबनाच्या बाबतीत राज्य घटनेच्या कलम ३११ मधील तरतुदी लागू होत नाहीत (संदर्भ स्अेट ऑफ ओरिसाविरुध्द शिवप्रसाद दास अे आय आर सुप्रीम कोर्ट ७०१ त्यामुळे निलंबन करण्यापूर्वी नोटीस दिली नाही किंवा म्हणणे ऐकून घेतले नाही या कारणास्तव कर्मचा-यास निलंबनास आव्हान देता येणार नाही कर्मच-यास योग्य कारणांसाठी निलंबित करण्याचा हक्क मालकास शासनास असतो (संदर्भ एम पॉल ॲन्थनी विरुध्द भारत गोल्ड माईस िलिमिटेड अे आय आर १९९९ सुप्रीम कोर्ट १४१६ ) | |
| PP३ | | **प्रस्तावासोबत जोडावयाची कागदपत्रे उदा. विहित नमुन्यातील अर्ज, खरेदीचे बिल, आधार कार्ड आदी** | **लाभार्थी/ व्यक्तींची वैयक्तिक कागदपत्रे** | | |
| | | | **कार्यालयीन कागदपत्रे** | | |
| PP४ | | प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी आवश्यक उपक्रम, कामाचे वार्षिक नियोजन, परीक्षा, मेळावे, कागदपत्र तपासणी कॅम्प , विशेष मोहिमा, प्रचार प्रसिध्दी | | **लागू नाही** | |

| पुणे जिल्हा परिषद- Process Mapping -Template | | | | |
|---|---|---|---|---|
| | | विभागाचे नाव | सामान्य प्रशासन विभाग | |
| अ. क्र. | प्रक्रिया स्थिती (Steages of Process Mapping) | बाब | माहिती | शेरा |
| PP५ | | प्रक्रिया प्रस्तावित करताना जिल्हा परिषद विभाग/ पंस/ ग्रापं/ जि. प. कडील अन्य क्षेत्रीय कार्यालये तसेच शासनाच्या विभाग/ उपक्रम/ मंडळे / महामंडळे / मनपा/ नपा/ कटकमंडळे/ खाजगी संस्था यांचेकडून प्राप्त करावयाची माहिती, मान्यता, शिफारस | १. प्राथमिक चौकशी अहवाल<br>२.कार्यालय प्रमुखाची शिफारस<br>३. निलंबित करावयाचे झाल्यास मुख्यालय देणे कामी रिकत पदांचा तपशिल<br>४. निलंबनाचा आदेश प्रारुप | |
| PP६ | | तपासणी अधिकारी स्तर पदनाम (Checker) (स.प्र.अ/क.प्र.अ/ पर्यवेक्षीय अधिकारी ) | १.सहाय्यक प्रशासन अधिकारी जि प पुणे | |
| PP७ | | प्रक्रिया मंजुरी देताना पडताळुन पहावयाच्या बाबी | तक्रारीचे स्वरुप, नियमातील तरतुदी , प्राथमिक अहवाल इ. | |
| PA१ | प्रक्रिया मंजुरी (process approval ) | मान्यता अधिकारी स्तर पदनाम (खातेप्रमुख /इतर ) | उपमुख्य कार्यकारी अधिकारी( साप्रवि) / संबधित विभागाचे खाते प्रमुख | |
| PA२ | | यादी/ आराखडा मान्यता अधिकार समितीस असल्यास, समिती नाव | लागू नाही. | |
| PA३ | | Endorsement(समर्थन ) अधिकारी स्तर पदनाम (मुकाअ /अति मुकाअ/ संबधित खातेप्रमुख) | मुख्य कार्यकारी अधिकारी जि प पुणे | |
| PM१ | प्रक्रिया त्रूटीशोध (process Mapping ) | मंजुरी प्रक्रियेमध्ये सातत्याने आढळणाऱ्या त्रुटी | लागू नाही. | |
| PI१ | प्रक्रिया सुधारणा (process improvization ) | अचुकता वेळेची बचत , मनुष्यबळ कार्यक्षम वापर , पारदर्शकता याकरिता माहिती तंत्रज्ञानाचा व संगणक आज्ञावली वापर करता येण्याजोग्या उपप्रक्रिया /बाबी | निलंबित करण्यात आलेल्या कर्मचा-यांविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात येते व त्या अनुषंगाने दोषारोपपत्रे बजावणे , खुलासा घेणे, आरोप अमान्य केल्यास चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी यांची नियुक्ती करणे, चौकशी अहवालाच्या अनुषंगाने शास्तीपूर्व अंतीम कारणे दाखवा नोटीस बजावणे, खुलासा मागणी करणे, अंतीम शास्ती आदेश निर्गमित करणे, निर्वाह भत्त्यात वाढ करणे, सेवेत पुर्नस्थापित करणे, अपिलावर अहवाल सादर करणे इ. प्रक्रिया विहित मुदतीत पार पाडणे आवश्यक असल्याने या बाबत प्रत्येक टप्प्याच्या अनुषंगाने प्रकरण कोणत्या स्तरावर प्रलंबित आहे या बाबत संगणक प्रणाली अदयावत करणे अत्यंत आवश्यक आहे. | |
| PI२ | | तांत्रिक (Technical) ज्ञान कमी पडत असल्यास प्रशिक्षण स्वरुप, अभ्यासक्रम | होय , कर्मचा-यांना निलंबित करण्यापूर्वी कोणकोणत्या बाबी आवश्यक आहे या बाबत सर्व कार्यालय प्रमुख व आस्थापना लिपीक यांना विविध माध्यमातुन प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. | |

| पुणे जिल्हा परिषद- Process Mapping -Template | | | | |
|---|---|---|---|---|
| विभागाचे नाव | | सामान्य प्रशासन विभाग | | |
| अ. क्र. | प्रक्रिया स्थिती (Steages of Process Mapping) | बाब | माहिती | शेरा |
| PI३ | | मुळ संकल्पना, उद्देश , लेखा संहिता, प्राधिकरण यांचे अधिकार यास धक्का न लावता प्रक्रिया सुधारणे करिता शासन स्तरावर प्रस्तावित करायच्या बाबी | PI१ मध्ये नमूद केल्यानुसार संगणक प्रणाली अदयावत करणे आवश्यक आहे. | |